आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.००वाजता

६ सप्टेंबर २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- गणपती बाप्पाच्या आगमनाची तयारी राज्यभर अंतिम टप्प्यात

- परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यात चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत महाराष्ट्र देशात अव्वल

- एकनाथ शिंदे यांच्याच नेतृत्वाखाली निवडणूक लढवण्याचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुनरुच्चार

- विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसकडून राज्यातल्या १७२ मतदारसंघांचा आढावा पूर्ण

- अमेरिकी बाजारातल्या संभाव्य परिस्थितीमुळं देशातल्या शेअर बाजारात मोठी घसरण, सेन्सेक्स १ हजारांहून अधिक अंकांनी गडगडला

**आणि**

- पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये प्रवीण कुमारला उंच उडी प्रकारात सुवर्णपदक

**<><><><><>**

राज्यात उद्यापासून गणेशोत्सवाला सुरुवात होणार आहे. त्यासाठी आज दिवसभर सजावटीचं सामान, पूजेचं सामान खरेदी करण्यासाठी बाजारपेठेत गर्दी झाली होती. राज्यातल्या अनेक भागात पावसानं हजेरी लावल्यानं ग्राहकांची काहीशी धांदल उडाली, मात्र उत्सवासाठीचा लोकांचा उत्साह ओसंडून वाहताना दिसला. दरम्यान, आज घरोघरी हरितालिका पूजनही करण्यात आलं.

गणेशोत्सवासाठी मुंबईतून रत्नागिरीत येणाऱ्या भाविकांसाठी पोलिसांनी १८ ठिकाणी मदत केंद्र उभारली आहेत. रेल्वेच्या विशेष गाड्या दररोज हजारो चाकरमान्यांना कोकणात घेऊन जात आहेत. मुंबई - गोवा महामार्गावर आज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्यांचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

कोकणातल्या गणेशोत्सवाच्या तयारीविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**व्हाइस कास्ट - रोहिणी गोरुले**

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यातल्या सालईवाडीच्या राजाचं आज जल्लोषात आगमन झालं. तळकोकणातला हा पहिला सार्वजनिक गणपती असून या उत्सवाचं हे ११९ वर्ष आहे.

**नवी मुंबईत** पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनवण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. अनेक जिल्ह्यांमध्ये बचत गटांमार्फत गणेश मूर्ती आणि सजावटीच्या साहित्याची विक्री करण्यात आली.

**पुणे** महानगरपालिकेनं मुर्ती आमची, किंमत तुमची हा उपक्रम राबवला आहे. या उपक्रमा अंतर्गत भाविकांनी शाडुची मुर्ती घ्यावी यासाठी प्रोत्साहन दिलं जात आहे. पुण्यात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहर आणि उपनगरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला असून सात हजार पोलीस तैनात करण्यात आले आहेत. तसंच या काळात प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी पीएमपी प्रशासनाकडून ८०० जादा गाड्यांची सोय करण्यात आली आहे.

**<><><><><>**

परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात गेली दोन वर्षं सातत्यानं देशात अव्वल स्थानी असलेल्या महाराष्ट्रानं चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतही हे स्थान टिकवून ठेवलं आहे. एप्रिल ते जून या पहिल्या तिमाहीत देशातल्या एकूण

गुंतवणुकीच्या ५२ टक्क्यांहून अधिक म्हणजेच सुमारे ७० हजार ७९५ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज एक्स माध्यमाद्वारे ही माहिती दिली. इतर आठ राज्यांमधल्या परकीय गुंतवणुकीच्या बेरजेपेक्षाही अधिक गुंतवणूक आणण्यात राज्य सरकार यशस्वी झाल्याचं त्यांनी सांगितलं. या यादीत दुसर्या क्रमांकावर कर्नाटक, तिसर्या क्रमांकावर दिल्ली, चौथ्या क्रमांकावर तेलंगणा तर पाचव्या क्रमांकावर गुजरात ही राज्यं आहेत.

**<><><><><>**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे महायुती सरकारचे प्रमुख असून त्यांच्या नेतृत्वाखाली विधानसभा निवडणुकीला सामोरे जाऊ, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा स्पष्ट केलं आहे. **नागपूरमधे** ते वार्ताहरांशी बोलत होते. मुख्यमंत्रीपदाचा चेहरा ठरवण्याचा अधिकार आपल्याला नसून तो हा निर्णय भाजपाचं संसदीय मंडळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार मिळून घेतील. हा निर्णय निवडणुकीच्या आधी घ्यायचा की नंतर हे तेच ठरवतील, असं त्यांनी सांगितलं. मुख्यमंत्रीपदावरून महायुतीत कसलाही संभ्रम नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

नागपूर शहरात पाणी साचण्याची समस्या दूर करण्यासाठी वीस गाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. या कामाची जबाबदारी नागपूर महापालिकेच्या आरोग्य विभागाकडे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याआधी ही जबाबदारी अभियांत्रिकी विभागाकडे होती, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीत कोणी किती जागा लढवाव्यात याबद्दल महायुतीच्या घटक पक्षांमध्ये मतभेद नसून राज्यात महायुतीचं सरकार आणणं हेच सामायिक उद्दिष्ट असल्याचं भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज सांगितलं. ते मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. उद्धव ठाकरे यांचं सरकार आल्यानंतर त्याआधीच्या सरकारने सुरू केलेल्या १५ योजना त्यांनी बंद केल्या, आता महाविकास आघाडीचं सरकार आलं, तर ५० ते ६० योजना बंद करण्याचा त्यांचा विचार आहे, असा दावा त्यांनी केला. त्यामुळे, राज्यातल्या १४ कोटी जनतेच्या कल्याणासाठी महायुतीचं सरकार आणणं गरजेचं आहे, असंही त्यांनी नमूद केलं. काँग्रेस आणि विरोधी पक्ष शब्दच्छल करत असल्याचा आरोप करत, देवेंद्र फडणवीस हे दूरदृष्टी असणारे नेते आहेत, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं आत्तापर्यंत राज्यातल्या १७२ मतदारसंघांचा आढावा घेतला असून २५ ऑगस्टपर्यंत सर्व मतदारसंघांचा आढावा पूर्ण होईल, अशी माहिती काँग्रेसचे राज्य प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी दिली आहे. राज्यात परिवर्तन करण्याची जनतेची मानसिकता आहे. त्यामुळं महाविकास आघाडीला दोन तृतीयांश बहुमत मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुंबईत टिळक भवनात पत्रकार परिषदेत ते बोलत होते. तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातल्या पुराची पाहणी करण्यासाठी केंद्रीय मंत्री गेले. त्या राज्यांना मदत मिळावी यासाठी कृषी मंत्री, अर्थमंत्री प्रयत्न करत आहेत. पण महाराष्ट्रातल्या पूरग्रस्तांकडे कोणाचंही लक्ष नसल्याची टीका प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली.

**<><><><><>**

राज्यात सध्या अस्तित्वात असलेलं महायुतीचं सरकार अडचणींच्या भोवऱ्यात सापडलेलं असून ते लवकरच पडेल, असं मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज मुंबईत वार्ताहरांशी बोलताना मांडलं. राज्यात सर्वाधिक गुंतवणूक आल्याचं सांगितलं जात आहे, मग नोकऱ्या का उपलब्ध होत नाहीत, असा सवालही सुळे यांनी विचारला.

**<><><><><>**

आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी राज्य सरकारने १५ हजार ३६० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या समाजावर कधीही अन्याय होऊ देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. गडचिरोली जिल्ह्यातल्या आलापल्लीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जनसन्मान यात्रेत ते बोलत होते. या कार्यक्रमापूर्वी त्यांनी नागेपल्लीमध्ये मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांशी संवाद साधला.

**<><><><><>**

चंद्रपूर जिल्ह्यातलं सागवान आता प्रधानमंत्री कार्यालयासाठी पाठवलं जाणार आहे. या  लाकडापासून प्रधानमंत्र्यांची खुर्ची आणि टेबल तयार केलं जाणार असल्याची माहिती राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. बल्लारपूर डेपोमधून सुमारे ३ हजार घनफूट सागवान यासाठी पाठवलं जाणार आहे. यापूर्वीही संसद भवन, भारत मंडपम, राम मंदिरासाठी जिल्ह्यातलं सागवान पाठवलं आहे.

**<><><><><>**

मुंबईतले माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर हत्येचा तपास मुंबई उच्च न्यायालयानं सीबीआयकडे सोपवला आहे. फेब्रुवारी महिन्यात फेसबुक लाइव्हमध्ये बोलत असताना गोळी झाडून त्यांची हत्या झाली होती. मुंबई पोलिसांची गुन्हे शाखा

या प्रकरणाचा तपास करत होती. पण त्यातल्या त्रुटींमुळं हा तपास सीबीआयकडे सोपवण्याचे आदेश उच्च न्यायालयानं दिले.

<><><><><>

अमेरिकेतले बेरोजगारीचे संभाव्य आकडे आणि फेडरल रिझर्व्हकडून व्याजदरात बदल होण्याच्या शक्यतेमुळे देशातल्या शेअर बाजारात आज मोठी घसरण झाली. सेन्सेक्स १ हजार १७ अंकांनी घसरून ८१ हजार १८४ अंकांवर बंद झाला. तर निफ्टी २९३ अंकांची घसरण नोंदवून २४ हजार ८५२ अंकांवर स्थिरावला.

<><><><><>

पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत आज भारताच्या प्रवीण कुमारनं पुरुषांच्या उंच उडी प्रकारात सुवर्णपदक पटकावलं. त्यानं २ पूर्णांक ०८ मीटर उंच उडी मारली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या यशाबद्दल प्रवीण कुमारचं अभिनंदन केलं आहे. याबरोबरच भारताची पदकसंख्या २६वर गेली आहे. यात ६ सुवर्ण, ९ रौप्य आणि ११ कास्यपदकांचा समावेश आहे. या स्पर्धेच्या आजच्या नवव्या दिवशी पदकतालिकेत आणखी भर घालण्याचा भारतीय क्रीडापटूंचा प्रयत्न राहील. पावर लिफ्टिंमध्ये कस्तुरी राजमणी महिलांच्या ६७ किलो वजनी गटात आज मैदानात उतरेल. भावनाबेन अजबजी चौधरी महिलांच्या भालाफेकीत, तर सोमान राणा आणि होकातो होतोझे सेमा पुरुषांच्या गोळाफेकीत सहभागी होतील. पॅरिस पॅरालिम्पिकचे काहीच दिवस बाकी आहेत आणि या स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी करण्याचं लक्ष्य भारताच्या क्रीडापटूंसमोर आहे.

<><><><><>

मुंबई शहर आणि उपनगरांत पुढचे दोन दिवस हवामान ढगाळ राहून अधूनमधून पावसाच्या सरी येतील, असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. कोकण, तसंच मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर मराठवाडा आणि विदर्भातल्या तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह मध्यम पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**